FORM-1 A

I.I.F.-1

ASSTT. COMMISSIONER OF POLICE, ANTI-CORRUPTION BUREAU, MUMBAI — सत्यमेव जयते

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि.मु., पहिली खबर क्र. १२ / २०१८ वर्ष, दिनांक १६/०२/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि., कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act १९८८, कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून १५/२/१८, वेळ ११:५० वा; तारीखे पर्यंत १५/२/१८, वेळ १३:३० वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख १८/०२/२०१८, वेळ
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख १६/०२/२०१८ वेळ
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा बजरंग टी हाऊस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. विठ्ठल डमप चौक
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव खेरवाडी पो.ठाणे, ठिकाणाचे नंबर समोर, बांद्रा (पु), गल्ली मुंबई, रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name गौ. उल्हास (b) वडीलाचे / पतीचे नाव आत्माराम कुळकर्णी
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ६७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९३२१०८१७८९
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय रियल इस्टेट
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste
(h) पत्ता : फ्लॅट नं.२ गल्ली / सर्वे नं. काशीत तीर्थ बिल्डींग घर / नाव नंबर ........ फोन / मो. नंबर नाही माहीत पॅन नं. ........ वोटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव पांडुरंग नाईक मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण माहिम, गाव मुंबई पोस्ट ........ पो. स्टे.
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
श्याम हरी आयरे, वय ३५ वर्षे, धंदा - नोकरी (पोलीस उप-निरीक्षक) नेमणूक खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई, रा. हि. क्रो/६/५०, मरोळ पोलीस वसाहत, मरोळ-मरोशी मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई

क

यातील, फिर्यादी श्री. प्रल्हाद आत्माराम कुलकर्णी,
वय ६७ वर्षे, व्यवसाय - रिअल इस्टेट. रा. ठि. फ्लॅट नं. २,
कपीलतिर्थ बिल्डींग, तळ मजला, पांडुरंग नाईक मार्ग,
माहिम, मुंबई नं. ४०००१६ यांचा स्वतंत्र कागदावर
सविस्तर जबाब नोंद करण्यात आला असून, तोच
गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे

(दिनकर पिंगळे)
सहाय्यक पो. आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुं.

खरी नक्कल

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

—फिर्याद— दिनांक— १५/०२/२०१९

श्री. उल्हास आत्माराम कुलकर्णी, वय ६७, धंदा — रिअल इस्टेट, रा.ठि.— फ्लॅट नं. २, कपीलतिर्थ बिल्डींग, तळ मजला, पांडुरंग नाईक मार्ग, माहिम, मुंबइ—४०००१६. मो.क्र. ९३२१०४१७८१, ९६११०४१७८१

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे पत्नीसोबत सन २००६ पासून राहत आहे. मी कस्टम खात्यामधून मागील सहा वर्षापुर्वी सेवानिवृत्त झालो आहे. सध्या मी रिअल इस्टेटचा व्यवसाय करीत असून सदर व्यवसायातील नफ्यामधून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी अनिरुध्द बापुंचा भक्त असून न्यू इंग्लिश स्कूल, वांद्रे, पुर्व येथे भजन मंडळात भजन गातो. आमचे भजन मंडळामध्ये कुमारी अमृता किशोर कुलकर्णी, रा. अंधेरी (पश्चिम), मुंबई या भजन गातात व त्यांच्या मागे आम्ही कोरस गातो.

दिनांक ०७/०२/२०१९ रोजी गुरुवारी सायंकाळी अंदाजे ६.०० वाजता माझ्या मोबाईलवर एक फोन आला व त्यांनी सांगितले कि, 'मी खेरवाडी पोलीस स्टेशन मधुन पी.एस.आय आयरे बोलतोय तुमच्या विरुध्द तक्रार असून तुम्ही खेरवाडी पोलीस स्टेशनला या'. असे सांगितले. त्याप्रमाणे मी सायंकाळी साधारण ०७.३० वा. चे दरम्यान खेरवाडी पोलीस स्टेशनला गेलो. तेथे कु. अमृता कुलकर्णी व तिचे आई—वडील बसलेले होते. पोलीस उप निरीक्षक आयरे यांना भेटलो असता त्यांनी मला पोलीस ठाणेच्या आतील रुममध्ये घेवून गेले व म्हणाले की, 'तुमच्या विरुध्द अमृता आणि त्यांच्या फॅमिलीची तक्रार आहे. तुला आम्ही लॉकअप मध्ये टाकणार आणि ९० दिवस जामीन पण भेटणार नाही.' 'तू मेंटल डॉक्टरकडे जा' असे म्हटल्यावर मी घाबरलो आणि तक्रार काय आहे असे विचारणा केली. परंतू त्यांनी माझे विरुध्दच्या तक्रारीबाबत कांही न सांगता 'तू, अमृता कुलकर्णी यांच्या मेणबत्तीच्या प्रदर्शनाला जाऊन जास्त मेणबत्या का घेतल्या? कमी घ्यायच्या होत्या ' अशी दमदाटी केली. त्यानंतर कु. अमृता कुलकर्णी व तिच्या फॅमीलीला घरी जाण्यास सांगितले आणी मला दरडावून इकडे बसून स्टेटमेंट दे असे सांगितले. सदर वेळी पोलीस उप निरीक्षक आयरे यांचे बाजूला साध्या कपडयात लॅपटॉप घेवून बसलेल्या व्यक्तीने आधीच टाईप केलेल्या स्टेटमेंटवर सही करण्यास सांगितले. मी सदर स्टेटमेंट वाचण्यास मागीतले असता त्यांनी वाचण्यास दिले नाही आणि गुपचूप सही करण्यास दरडावले. मी सदर स्टेटमेंटवर सही करताना पुसटसे वाचले असता त्यामध्ये कुमारी अमृता कुलकर्णीवर मी एकतर्फी प्रेम करतो व तिचा पाठलाग करतो व यापुढे असे करणार नाही असे त्यामध्ये लिहीलेले होते. मी सदर स्टेटमेंटवर सही केली असता साध्या कपडयातील लॅपटॉप वरील व्यक्तीने पोलीस उप निरीक्षक आयरे यांना विचारले की, हयांना जाऊ द्यायचे का? दरम्यान मी पोलीस उप निरीक्षक आयरे यांना म्हटले की, साहेब काय तक्रार असेल ते मला सांगा मी कांहीच केलेले नाही, मला यातुन बाहेर काढा. तेव्हा पोलीस उप निरीक्षक आयरे मला म्हणाले की, तु मला रुपये ५० हजार दे मग मी तुला वाचवितो.

पोलीस उप निरीक्षक आयरे यांनी मागणी केल्या प्रमाणे माझेकडे रु. ५० हजार नसल्याने तसेच सदर प्रकरणाबाबत मला भिती वाटू लागल्याने मंगळवार दिनांक १२/०२/२०१९ रोजी मी रु. १०,०००/– जमा करुन रात्रौ ०८.०० वा. चे सुमारास खेरवाडी पोलीस ठाणेमध्ये जाऊन पोलीस उप निरीक्षक आयरे यांना दिले. त्यानंतर आयरे यांनी मला उर्वरीत रक्कमेबाबत विचारणा केली असता मी लवकरच आणुन देतो असे सांगुन घरी जाणेसाठी निघालो. मी घरी जात असताना पोलीस ठाणेच्या गेटवर साध्या कपडयातील दोन व्यक्ती भेटल्या व त्या मला म्हणाल्या की, तु आयरे साहेबांना एक लाख रुपये दिलेस तरच हे प्रकरण मिटेल.

मला पोलीस उप निरीक्षक आयरे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १४/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येवून तेथील वरिष्ठांना भेटलो. त्यांनी मला सहाय्यक पोलीस आयुक्त दिनकर पिंगळे व सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र अहिरे यांची भेट घालून दिली व मला माझा तक्रार अर्ज लेखी देण्यास सांगितले. त्यानुसार मी माझे स्वहस्ताक्षरात अर्ज लिहून दिला. त्यानंतर मला सांगितले की, मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. तदनंतर सहाय्यक पोलीस आयुक्त पिंगळे साहेब यांनी मला त्यांचे कक्षात घेवून गेले व तेथे उपस्थित पंचांची ओळख करुन दिली त्यावेळी मी माझे तकारी बाबत पंचाना माहिती दिली. सपोआ पिंगळे यांनी माझा तकार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचानी वाचून त्यांवर स्वाक्षऱ्या केल्या व त्यानंतर सपोआ पिंगळे यांनी सही केली. तदनंतर गोपनीय कक्षामध्ये पंचांसमक्ष माझे, सपोआ पिंगळे व पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार यांची ओळख करुन दिली त्यानतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी रवाना झालो. शासकीय वाहन धारावी–बांद्रा रोडवर डाव्या बाजूला थांबले. तेथे माझे शर्टचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात आले. मला व पंच श्री. कृष्णा जाधव यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर मी व पंच असे रिक्षाने खेरवाडी पोलीस ठाणेस गेलो. तेथे ठाणे अंमलदार कक्षामध्ये पोलीस उप निरीक्षक आयरे यांचेबाबत विचारणा केली असता ते अलीबाग येथे फायरींग सरावासाठी गेल्याचे सांगितले. तेथून मी व पंच रिक्षाने परत शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी आलो. तेथे सपोआ पिंगळे यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले. त्यानंतर मी त्यांना सदरची माहिती दिली. त्यानंतर पोलीस पथक व पंचासह आम्ही ला.प्र.वि. कार्यालय येथे आलो असता सपोआ पिंगळे यांनी मला व पंच यांना दिनांक १५/०२/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा. परत येण्याच्या सुचना दिल्याने मी घरी निघून गेलो.

समक्ष
(दिनकर पिंगळे)
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

दिनांक १५/०२/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा. ला.प्र.वि. कार्यालयात येवून सपोआ पिंगळे यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, लाचेच्या

**खरी नक्कल**

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

ASST. COMMISSIONER OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

मागणीची सत्यता पडताळणेसाठी पुन्हा आपल्याला खेरवाडी पोलीस ठाणे येथे जाऊन पडताळणी करायची आहे. त्यानंतर सपोआ पिंगळे यांनी मला व पंचाना गोपनीय कक्षामध्ये नेले. तेथे माझे व पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केला त्यानंतर पडताळणीसाठी मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून रवाना झालो. आमचे शासकिय वाहन धारावी–बांद्रा रोडवर डाव्या बाजूला थांबले. तेथे माझे शर्टचे आतील बाजूस बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावण्यात आले. त्यानंरत मी व पंच रिक्षाने खेरवाडी पोलीस ठाणेस गेलो तेथे ठाणे अंमलदार कक्षामध्ये पोलीस उप निरीक्षक आयरे यांचेबाबत विचारणा केली असता ते बंदोबस्तास बाहेर गेल्याचे सांगितले. मी पोलीस ठाणेच्या बाहेर येवून पोलीस उप निरीक्षक आयरे यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी ते बंदोबस्तासाठी बाहेर असून पोलीस ठाणेस थांबण्यास सांगितले. कांही वेळाने मी पुन्हा पोलीस उप निरीक्षक आयरे यांना त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क करुन मला येथील काम आटोपून अंबरनाथ येथे जाणेचे आहे असे सांगितले असता त्यांनी ते चेतना कॉलेजचे बाजूला कलेक्टर ऑफिस येथे मोर्चा बंदोबस्तासाठी असून तेथे येवून भेटण्यास सांगितले. त्यानुसार मी व पंच कलेक्टर ऑफीस येथे गेलो. तेथे पोलीस उप निरीक्षक आयरे यांना भेटलो. त्यावेळी मी त्यांच्याशी माझ्या कामासंदर्भात चर्चा करताना त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी उर्वरीत लाचेची रक्कम रु. ४०,०००/— स्विकारण्याचे मान्य केले. त्यावेळी थोडया वेळात पैसे घेवून येतो असे सांगून मी व पंच रिक्षाने पुन्हा शासकीय वाहनाजवळ आलो. स.पो.आ. पिंगळे यांनी माझे शर्टचे आतमध्ये लावलेले डिजीटल रेकॉर्डर बाहेर काढून बंद केले व पुन्हा चालू करुन संभाषण ऐकले. पोलीस उप निरीक्षक आयरे यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने सपोआ पिंगळे साहेबांनी अँथ्रॉसिन पावडरचे गुणधर्म सांगितले व सापळा कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी माझेकडील रु.२०,०००/—(रु.५०० दराच्या भारतीय चलनातील ३६ नोटा व रु. २००० ची ०१ भारतीय चलनातील नोट) सपोआ पिंगळे यांचेकडे दिल्या. त्यामध्ये रु. २०००/— च्या टॉय करंन्सी च्या १० नोटा रु २०,०००/— असे एकूण रु. ४०,०००/— च्या नमुद नोटां एकत्र करुन पोलीस वाहनावरील पोलीस अंमलदार चालक क्र. ०७—०१९०/पवार यांचेमार्फत पंचासमक्ष अँथ्रॉसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली व त्या नोटा पोलीस अंमलदार चालक पवार यांनी त्यांचे हाताने माझे पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. मला सपोआ पिंगळे साहेब यांनी सापळा कार्यवाही संदर्भात सुचना दिल्या तसेच पोलीस उप निरीक्षक आयरे यांनी पैसे स्विकारल्या नंतर रुमाल डोक्यावरुन फिरवुन पथकास इशारा करण्याबाबत सांगितले. दरम्यान सपोआ पिंगळे यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. कृष्णा जाधव यांचे समवेत पोलीस उप निरीक्षक आयरे यांना भेटण्यासाठी खेरवाडी पोलीस ठाणे येथे गेलो. तेथे गेल्यानंतर प्रवेशव्दारा जवळ थांबुन पोलीस उप निरीक्षक आयरे यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी पोलीस ठाणेच्या गेटवर थांबणेस सांगितले. थोड्या वेळात पोलीस ठाणेमधून पोलीस उप निरीक्षक आयरे बाहेर आले व मला

ASSTT. COMMISSIONER OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

घेवून पोलीस ठाणेचे समोर असलेल्या चहाचे हॉटेलमध्ये घेवून गेले. तेथे माझेशी तक्रारीचे अनुषंगाने चर्चा करुन माझ्याकडे पैशाची मागणी केली असता मी त्यांना माझे पॅन्टचे उजव्या खिशातील पैशाचे बंडल उजव्या हाताने काढून त्यांच्या समोर केले असता त्यांनी डाव्या हाताने स्विकारले व मोजून पॅन्टचे डाव्या खिशात ठेवले. तदनंतर मी चहाच्या गाळया बाहेर आलो व पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पोलीस उप निरीक्षक आयरे यांनी लाचेचे पैसे स्विकारल्याबाबतचा इशारा म्हणून माझे खिशातील रुमाल काढून डोक्यावरुन फिरवला. दरम्यान पोलीस उप निरीक्षक आयरे हे चहाचे गाळयातून बाहेर रस्त्यावर आले असता सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना ताब्यात घेतले.

आज दिनांक १५/०२/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक आयरे नेमणूक खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई यांनी कुमारी अमृता कुलकणी यांनी माझे विरुध्द केलेल्या तक्रारी संदर्भात रु. ५०,०००/– लाचेची मागणी केली. त्यामधील रु. १०,०००/– दिनांक १२/०२/२०१९ रोजी स्विकारले व उर्वरित रु ४०,०००/– ची मागणी केलेली लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान स्विकारली असता सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यास रंगेहाथ पकडले. पोलीस उप निरीक्षक शाम आयरे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( दिनकर पिंगळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

खरी नक्कल

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down detail in blank page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे विरुद्ध खेरवाडी पो. ठाणेस प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर कारवाई न करण्यासाठी आरोपीत लोकसेवक याने फिर्यादी यांचेकडे रु. ५०,०००/- रोख रक्कमेच्या लाचेची मागणी करुन कोणत्याही कायदेशीर पारिश्रमिकाशिवाय प्रथम रु. १०,०००/- पारितोषण म्हणून स्विकारुन उर्वरित रु. ४०,०००/- पारितोषण म्हणून स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८ (सुधारित-२०१८) अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..........., जिल्हा ..........., राज्य ...........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................. (3) Transferred to P.S ............................................, District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... दिनकर पिंगळे

पदनाम Rank ... सहाय्यक पोलीस आयुक्त,

तपासिक अं. चा कोड. क्र. ... लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई.

Posting

Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

खरी नक्कल

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.